भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५

(१९५५ चा अधिनियम क्रमांक ४५)

[१ एप्रिल १९९६ रोजी यथाविद्यमान]

# The Working Journalists and Other Newspaper Employees (Conditions of Service) and Miscellaneous Provisions Act, 1955

(Act No. 45 of 1955)

[As in force on the 1st April 1996]

संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९९८

[ किंमत रु. ३-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ एप्रिल १९९६ रोजी यथाविद्यमान असलेला दी वर्किंग जर्नालिस्ट अँड अदर न्यूजपेपर एम्प्लॉईज (कंडिशन्स ऑफ सर्विस) मिसलेनिअस प्रोव्हिजनस अॅक्ट, १९५५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग. १, खंड ७, अंक २, दिनांक १६ ऑगस्ट १९९६, यात पृष्ठ २८१ ते २९२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली.
दिनांक १६ ऑगस्ट १९९६.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Working Journalists and other Newspaper Employees (Conditions of Service) and Miscellaneous Provisions Act, 1955 on the 1st April 1996 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India Extraordinary Part Section 1, No. 2, Vol. 7, dated 16th August, 1996 on pages 281 to 292.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated: 16th August 1996.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

## विशोधन अधिनियमांची सूची

१. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९६०' (१९६० चा ५८).

२. 'श्रमिक पत्रकार (विशोधन) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ६५).

३. 'पाँडिचेरी (कायद्यांचे विस्तारण) अधिनियम, १९६८' (१९६८ चा २६).

४. 'केंद्रीय कामगार कायदे (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९७०' (१९७० चा ५१).

५. 'श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध (विशोधन) अधिनियम, १९७४' (१९७४ चा ६०).

६. 'श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध (विशोधन) अधिनियम, १९७९' (१९७९ चा ६).

७. 'श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आ.ण संकीर्ण उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८९' (१९८९ चा ३१).

# श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५

कलमे

कलमांचा क्रम


## प्रकरण पहिले

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.
२. व्याख्या.

## प्रकरण दुसरे

### श्रमिक पत्रकार

३. १९४७ चा अधिनियम १४ श्रमिक पत्रकारांना लागू असणे.
४. कपातीच्या विवक्षित प्रकरणांबाबत विशेष उपबंध.
५. उपदान देणे.
५क. श्रमिक पत्रकाराने नामनियुक्ती करणे.
६. कामाचे तास.
७. रजा.
८. वेतनदरांची निश्चिती अथवा त्यांत सुधारणा.
९. वेतनदर निश्चित करण्याची व त्यांत सुधारणा करण्याची कार्यपद्धती.
१०. मंडळाच्या शिफारशी.
११. मंडळाच्या शक्ती व कार्यपद्धती.
१२. वेतन मंडळाच्या शिफारशी अंमलात आणणाऱ्या, केंद्र शासनाच्या शक्ती.
१३. श्रमिक पत्रकार, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांहून कमी नाही इतक्या दराने वेतनास हक्कदार असणे.
१३क. अंतरिम वेतनदर निश्चित करण्याची शासनाची शक्ती.
१३कक. श्रमिक पत्रकारांच्या संबंधात वेतनदर निश्चित करणे किंवा सुधारणे याकरिता अधिकरण घटित करणे.

## प्रकरण दुसरे-क

### पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचारी

१३ख. पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या वेतनदरांची निश्चिती किंवा सुधारणा.
१३ग. पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांचे वेतनदर निश्चित करण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी वेतनमंडळ.
१३घ. विवक्षित उपबंध लागू होणे.
१३घघ. पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या संबंधात वेतनदर निश्चित करणे किंवा त्यात सुधारणा करणे याकरिता अधिकरण घटित करणे.

## प्रकरण तिसरे

### वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना विवक्षित अधिनियम लागू करणे

१४. १९४६ चा अधिनियम २० हा वृत्तपत्र आस्थापनांना लागू असणे.
१५. १९५२ चा अधिनियम १९ हा वृत्तपत्र आस्थापनांना लागू असणे.

## प्रकरण चौथे

### संकीर्ण

१६. या अधिनियमाशी विसंगत असणारे कायदे व करार यांची परिणामकता.
१६क. नियोक्ता वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना पदच्युत, सेवोन्मुक्त करणार नाही.
१७. नियोक्त्याकडून येणे असणाऱ्या पैशांची वसुली.
१७क. नोंदवह्या, अभिलेख व हजेरीपट ठेवणे.
१७ख. निरीक्षक.
१८. दंड.
१९. दायित्वनिराकरण.
१९क. नियुक्त्यांमधील उणिवांमुळे कृती विधिबाह्य ठरावयाच्या नाहीत.
१९ख. व्यावृत्ती.
२०. नियम करण्याची शक्ती.
२१. [निरसित].

# श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५

[१९५५ चा अधिनियम क्रमांक ४५][१]

(१ एप्रिल १९९६ रोजी यथाविद्यमान)

[२० डिसेंबर, १९५५]

**वृत्तपत्र आस्थापनांमध्ये कामाला असलेले श्रमिक पत्रकार व अन्य व्यक्ती यांच्या विवक्षित सेवाशर्ती विनियमित करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण पहिले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास [२]['श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी] (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५' असे म्हणता येईल. संक्षिप्त नांव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार [३]* * * * संपूर्ण भारतभर आहे.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

[४][(क) "मंडळ" याचा—

(एक) श्रमिक पत्रकारांच्या संबंधातील अर्थ, कलम ९ खाली घटित केलेले वेतन मंडळ, असा आहे ; आणि

(दोन) पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या संबंधातील अर्थ, कलम १३ग खाली घटित केलेले वेतन मंडळ, असा आहे ; ]

(ख) "वृत्तपत्र" याचा अर्थ, लोकवार्ता किंवा लोकवार्तेवरील टीकाटिप्पणी अंतर्भूत असलेले कोणतेही मुद्रित नियतकालिक, असा आहे आणि त्यामध्ये, केंद्र शासन याबाबतीत शासकीय राजपत्रात वेळोवेळी अधिसूचित करील अशा अन्य वर्गाच्या मुद्रित नियतकालिकांचा समावेश होतो ;

(ग) "वृत्तपत्र कर्मचारी" याचा अर्थ, कोणताही श्रमिक पत्रकार, असा आहे, आणि कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये किंवा तिच्या संबंधात कामाला असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीचा त्यामध्ये समावेश होतो ;

(घ) "वृत्तपत्र आस्थापना" याचा अर्थ, एका किंवा अधिक वृत्तपत्रांच्या निर्मितीसाठी किंवा प्रकाशनासाठी अथवा कोणतीही वृत्तसंस्था किंवा सिंडिकेट चालवण्यासाठी असणारी, कोणत्याही व्यक्तीच्या किंवा निगमित असलेल्या वा नसलेल्या व्यक्तिनिकायाच्या नियंत्रणाखालील आस्थापना, असा आहे ;

[५][आणि त्यात अनुसूची अन्वये एक आस्थापना म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या वृत्तपत्र आस्थापनेचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनासाठी,—

(क) वृत्तपत्र आस्थापनांचे भिन्न विभाग, शाखा आणि केंद्रे ही त्यांचे भाग असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) वृत्तपत्र छपाई हा मुद्रणालयाचा प्रमुख व्यवसाय असेल तर ते मुद्रणालय ही वृत्तपत्र आस्थापना मानण्यात येईल ; ]

[६][(घघ) "पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचारी" याचा अर्थ, कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये किंवा तिच्या संबंधात कोणतेही काम करण्यासाठी नेमलेली व्यक्ती, असा आहे परंतु जी व्यक्ती—

(एक) श्रमिक पत्रकार असेल, किंवा

(दोन) मुख्यत्वेकरून एखाद्या व्यवस्थापकीय किंवा प्रशासकीय हुद्यावर नेमलेली असेल, किंवा

---

१. १९६३ चा विनियम ११, कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीव येथे आणि १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूची यांद्वारे पाँडिचरी येथे विस्तारित करण्यात आला.

२. १९७४ चा अधिनियम ६०, कलम २ द्वारे "श्रमिक पत्रकार" या ऐवजी हा मजकूर घातला.

३. १९७० चा अधिनियम ५१, कलम २ व अनुसूची यांद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीज-करून" हा मजकूर गाळला.

४. १९७४ चा अधिनियम ६०, कलम ३ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातले.

५. १९८९ चा अधिनियम ३१, कलम २ (एक) द्वारे घातले.

६. १९७४ चा अधिनियम ६०, कलम ३ द्वारे घातले.

(तीन) पर्यवेक्षकीय हुद्यावर नेमलेली असून, तिच्या पदाशी संलग्न असलेल्या कर्तव्यांच्या स्वरूपामुळे किंवा तिच्यामध्ये निहित असलेल्या शक्तींमुळे मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय स्वरूपाची कार्ये पार पाडत असेल,

अशा कोणत्याही व्यक्तीचा त्यामध्ये समावेश नाही ;]

(ङ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

[1][(ङङ) "अधिकरण" याचा,—

(एक) श्रमिक पत्रकारांच्या संबंधातील अर्थ, कलम १३कक अन्वये घटित करण्यात आलेले अधिकरण, असा आहे ; आणि

(दोन) पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या संबंधातील अर्थ, कलम १३घघ अन्वये घटित करण्यात आलेले अधिकरण, असा आहे ;]

[1][(ङङङ) "वेतन" याचा अर्थ, सेवायोजनाच्या शर्ती, मग त्या व्यक्त स्वरूपातील असोत वा अभिप्रेत असोत--पूर्ण केल्यास वृत्तपत्र कर्मचाऱ्याला त्याच्या सेवेबद्दल किंवा त्या सेवेत केल्या जाणाऱ्या कामाबद्दल देय होणाऱ्या पैशाच्या स्वरूपात व्यक्त करता येण्याजोगा मोबदला, असा आहे, आणि त्यात—

(एक) त्या काळी वृत्तपत्र कर्मचाऱ्याला जे भत्ते (महागाई भत्ता मिळून) मिळण्याचा हक्क असेल ते भत्ते ;

(दोन) कोणत्याही निवासव्यवस्थेचे मूल्य किंवा वीजपुरवठा, पाणीपुरवठा, वैद्यकीय मदत किंवा अन्य सुखसोयी यांचे मूल्य किंवा कोणतीही सेवा किंवा कोणत्याही अन्नधान्यांचा किंवा इतर वस्तूंचा सवलतीच्या दराने होणारा पुरवठा यांचे मूल्य ;

(तीन) कोणतीही प्रवास सवलत—

यांचा समावेश असेल ; परंतु, त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश नसेल—

(क) कोणताही बोनस ;

(ख) कोणत्याही निवृत्तिवेतन निधीत किंवा भविष्य निर्वाह निधीत मालकाद्वारे भरणा केलेले किंवा करावयाचे कोणतेही अंशदान किंवा वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी त्याकाळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये दिलेले वा देय असलेले अंशदान ;

(ग) त्याच्या सेवा समाप्तीनंतर देय असणारे कोणतेही उपदान;

**स्पष्टीकरण.**—या खंडामध्ये "वेतन" या संज्ञेत, वेळोवेळी निश्चित केलेल्या कोणत्याही वर्णनाच्या नवीन भत्यांचा समावेश असेल.]

(च) "श्रमिक पत्रकार" याचा अर्थ, ज्या व्यक्तीचा प्रमुख व्यवसाय पत्रकाराचा असून जी, त्या नात्याने कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये किंवा तिच्या संबंधात नेमलेली असेल ती व्यक्ती, असा आहे, आणि त्यामध्ये संपादक, अग्रलेख-लेखक, वृत्तसंपादक, उप संपादक, विशेषसाहित्य-लेखक प्रत-निरीक्षक, वार्ताहर, वृत्त प्रतिनिधी, व्यंगचित्रकार, वृत्त छायाचित्रकार व मुद्रित-तपासनीस यांचा समावेश होतो, परंतु जी व्यक्ती—

(एक) मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय किंवा प्रशासकीय हुद्यावर नेमलेली असेल, किंवा

(दोन) पर्यवेक्षकीय हुद्यावर नेमलेली असून तिच्या पदाशी संलग्न असलेल्या कर्तव्यांच्या स्वरूपामुळे किंवा तिच्यामध्ये निहित केलेल्या शक्तींमुळे मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय स्वरूपाची कार्ये पार पाडत असेल,

अशा कोणत्याही व्यक्तीचा त्यामध्ये समावेश नाही ;

(छ) या अधिनियमामध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) यामध्ये व्याख्या केलेले सर्व शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमामध्ये त्यांना नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

## प्रकरण दुसरे

### श्रमिक पत्रकार

१९४७ चा अधिनियम, १४ श्रमिक पत्रकारांना लागू असणे.

३. (१) त्या त्या काळी अंमलात असल्याप्रमाणे 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) याचे उपबंध त्या अधिनियमाच्या अर्थानुसार कामगार असणाऱ्यांना किंवा त्यांच्या संबंधात ते जसे लागू आहेत त्याप्रमाणे ते पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आपरिवर्तनांसह श्रमिक पत्रकारांना किंवा त्यांच्या संबंधात लागू होतील.

---

१. १९७९ चा अधिनियम ६, कलम २ द्वारे घातले (३१ जानेवारी, १९७९ रोजी व तेव्हापासून).

२. १९८९ चा अधिनियम ३१, कलम २ (दोन) द्वारे घातले.

(२) पूर्वोक्त अधिनियमांचे कलम २५च श्रमिक पत्रकारांना लागू करताना, एखाद्या कामगाराच्या कपातीच्या संबंधात त्या कलमाच्या खंड (क) मध्ये नोटिशीचा जो अवधि निर्देशित केला आहे. त्याऐवजी एखाद्या श्रमिक पत्रकाराच्या कपातीच्या संबंधात नोटिशीचे पुढील अवधी नमूद केलेले असावेत असे समजून त्या खंडाचा अर्थ लावला जाईल, ते अवधी असे :—

(क) संपादकाच्या बाबतीत, सहा महिने, आणि

(ख) अन्य कोणत्याही श्रमिक पत्रकाराच्या बाबतीत, तीन महिने,

४. जर १४ जुलै, १९५४ व १२ मार्च, १९५५ या दिवसांच्या दरम्यान केव्हाही एखाद्या श्रमिक पत्रकाराला कमी केलेले असेल तर,— कपातीच्या विवक्षित प्रकरणांबाबत विशेष उपबंध.

(क) अशा कपातीपूर्वी त्याला एक महिन्याची लेखी नोटिस दिलेली नसल्यास, अशा कपातीच्या लगतपूर्वी तो ज्या दराने वेतनास हक्कदार होता त्या दराने एक महिन्याचे वेतन; आणि

(ख) त्या नियोक्त्याकडे केलेल्या नोकरीच्या प्रत्येक संपूर्ण वर्षाकरिता किंवा सहा महिन्यांपेक्षा अधिक अशा त्याच्या कोणत्याही भागाकरिता पंधरा दिवसांच्या सरासरी वेतनाच्या सममूल्याइतकी असेल तेवढी भरपाई,

नियोक्त्याकडून मिळण्यास तो हक्कदार असेल.

[1][५. (१) जर— उपदान देणे.

(क) कोणताही श्रमिक पत्रकार कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर कमीत कमी सलग तीन वर्षे इतका काळ नोकरीमध्ये असेल, आणि—

(एक) त्या वृत्तपत्र आस्थापनेच्या संबंधातील नियोक्त्याने शिस्तभंगाच्या कारवाईच्या रूपात दिलेली शिक्षा म्हणून नव्हे तर, अन्यथा कोणत्याही कारणास्तव त्याची नोकरी समाप्त केली असेल तर; किंवा

(दोन) वयोनिवृत्तिच्या वयास पोहोचून तो सेवेतून निवृत्त झाला तर; किंवा

(ख) कोणताही श्रमिक पत्रकार कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर कमीत कमी सलग दहा वर्षे इतका काळ नोकरीमध्ये असेल आणि त्याने सद्सद्विवेकबुद्धीला पटत नाही म्हणून नव्हे तर, अन्य कोणत्याही कारणावरून १ जुलै, १९६१ रोजी किंवा त्यानंतर त्या आस्थापनेतील नोकरीचा स्वेच्छेने राजीनामा दिला असेल तर; किंवा

(ग) कोणताही श्रमिक पत्रकार कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर कमीत कमी सलग तीन वर्षे इतका काळ नोकरीत असेल आणि त्याने आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला पटत नाही म्हणून १ जुलै, १९६१ रोजी किंवा त्यानंतर त्या आस्थापनेतील नोकरीचा राजीनामा दिला असेल तर; किंवा

(घ) कोणताही श्रमिक पत्रकार कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये नोकरीला असतानाच मृत्यू पावला तर, त्या श्रमिक पत्रकाराला, किंवा त्याचा मृत्यू झाला असल्यास त्याने नामनियुक्त केलेली किंवा केलेल्या व्यक्ती यांना किंवा प्रकरणपरत्वे, श्रमिक पत्रकाराच्या मृत्यूच्या वेळेस नामनियुक्तीपत्र अंमलात नसल्यास त्याच्या कुटुंबाला, त्या आस्थापनेच्या संबंधातील नियोक्त्याकडून अशी समाप्ती, निवृत्ती, राजीनामा किंवा मृत्यू झाल्यानंतर 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७'(१९४७ चा १४) याखाली उपार्जित होणाऱ्या कोणत्याही लाभांना किंवा अधिकारांना बाध न येता नोकरीच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी किंवा सहा महिन्यांहून अधिक अशा त्यांच्या कोणत्याही भागासाठी पंधरा दिवसांच्या सरासरी वेतनाएवढे असेल तेवढे उपदान दिले जाईल :

परंतु, खंड (ख) मध्ये निर्देशित केलेल्या श्रमिक पत्रकाराच्या बाबतीत त्याला प्रदेय असेल अशी उपदानाची एकूण रक्कम ही साडेबारा महिन्यांच्या सरासरी वेतनाहून अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, ज्या आस्थापनेमध्ये या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही दिवशी सहापेक्षा अधिक श्रमिक पत्रकार कामाला लावलेले होते अशा कोणत्याही आस्थापनेमध्ये जर अधिक पत्रकार कामाला असेल तर, अशा कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये कामाला असलेल्या श्रमिक पत्रकाराला अशा प्रारंभापूर्वी कोणत्याही सेवावधीसाठी प्रदेय असलेले उपदान हे, नोकरीच्या प्रत्येक पूर्ण वर्षागणिक किंवा सहा महिन्यांहून अधिक अशा त्याच्या कोणत्याही भागागणिक पंधरा दिवसांच्या सरासरी वेतनाएवढे असणार नाही, पण ते—

(क) जर अशा पूर्वीच्या नोकरीचा कालावधी पाच वर्षांहून अधिक नसेल तर, नोकरीच्या प्रत्येक पूर्ण वर्षागणिक किंवा सहा महिन्यांहून अधिक अशा त्याच्या भागागणिक तीन दिवसांचे सरासरी वेतन;

---

१. १९६२ चा अधिनियम ६५, कलम ३ द्वारे मूळ कलम ५ ऐवजी घातले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

(ख) जर अशा पूर्वीच्या नोकरीचा कालावधी पाच वर्षांहून अधिक असेल पण दहा वर्षांहून अधिक नसेल तर, नोकरीच्या प्रत्येक पूर्ण वर्षागणिक किंवा सहा महिन्यांहून अधिक अशा त्याच्या भागागणिक पाच दिवसांचे सरासरी वेतन ;

(ग) जर अशा पूर्वीच्या नोकरीचा कालावधी दहा वर्षांहून अधिक असेल तर, नोकरीच्या प्रत्येक पूर्ण वर्षागणिक किंवा सहा महिन्यांहून अधिक अशा त्याच्या भागागणिक सात दिवसांचे सरासरी वेतन,

यांच्या रकमेएवढे असेल.

**स्पष्टीकरण.**—हे पोटकलम आणि कलम १७, पोटकलम (१) याच्या प्रयोजनार्थ, "कुटुंब" याचा अर्थ, पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) पुरुष श्रमिक पत्रकाराच्या बाबतीत त्याची विधवा, विवाहित वा अविवाहित अपत्ये आणि त्यांचे परावलंबी मातापिता, आणि त्याच्या मृत मुलाची विधवा व अपत्ये :

परंतु, श्रमिक पत्रकाराची विधवा त्याच्या मृत्यूच्या वेळेस जर कायदेशीरपणे त्याच्याकडून निर्वाहव्यवस्था होण्यास हक्कदार नसेल तर, ती त्याच्या कुटुंबाचा घटक असल्याचे मानण्यात येणार नाही ;

(दोन) स्त्री श्रमिक पत्रकाराच्या बाबतीत, तिचा पती, विवाहित वा अविवाहित अपत्ये आणि श्रमिक पत्रकार स्त्रीचे किंवा तिच्या पतीचे परावलंबी मातापिता व तिच्या मृत मुलाची विधवा व अपत्ये :

परंतु, जर श्रमिक पत्रकार स्त्रीने आपल्या पतीला कुटुंबामधून वगळले जावे अशी आपली इच्छा प्रदर्शित केली तर, त्या श्रमिक पत्रकाराला स्त्रीचा पती व त्याचे परावलंबी मातापिता हे तिच्या कुटुंबाचे घटक असल्याचे मानण्यात येणार नाही,

आणि वरील दोहोंपैकी कोणत्याही प्रकरणी, जर त्या श्रमिक पत्रकाराचे किंवा श्रमिक पत्रकाराच्या मृत मुलाचे अपत्य अन्य व्यक्तीने दत्तक घेतलेले असेल आणि दत्तकग्राहीच्या व्यक्तिगत कायद्यान्वये दत्तकाला कायदेशीर मान्यता असेल तर, असे अपत्य त्या श्रमिक पत्रकाराच्या कुटुंबाचा घटक मानले जाणार नाही.

(२) कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेतील एखाद्या श्रमिक पत्रकाराने सद्सद्विवेकबुद्धीला पटत नाही म्हणून स्वेच्छेने नोकरीचा राजीनामा दिलेला आहे किंवा काय याबाबतचा तंटा हा 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) किंवा औद्योगिक तंटयांचे अन्वेषण व मिटवणूक यांसंबंधी एखाद्या राज्यामध्ये अंमलात असणारा कोणताही समनुरूप कायदा यांत अभिप्रेत असल्याप्रमाणे औद्योगिक विवाद असल्याचे मानण्यात येईल.

(३) जर नामनियुक्त व्यक्ती अज्ञान असेल आणि पोटकलम (१) खालील उपदान, ती अज्ञानदशेत असताना तिला प्रदेय झाले असेल तर, ते उपदान कलम-५क पोटकलम (३) खाली नियुक्त केलेल्या व्यक्तीला दिले जाईल :

परंतु, जेव्हा अशी कोणतीही व्यक्ती नसेल तेव्हा, ते उपदान सक्षम न्यायालयाने अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीचा पालक म्हणून नियुक्त केलेल्या कोणालाही आणि जेव्हा असा कोणताही पालक नियुक्त केलेला नसेल तेव्हा, अज्ञान व्यक्तीच्या मातापित्यांपैकी कोणालाही किंवा जेव्हा माता वा पिता यांपैकी कोणीही जिवंत नसेल तेव्हा, अज्ञान व्यक्तीच्या अन्य कोणत्याही पालकाला दिले जाईल :

परंतु आणखी असे की, जर उपदान दोन किंवा अधिक नामनियुक्त व्यक्तींना प्रदेय असून त्या दोहोंपैकी एक अथवा त्याहून अधिक नामनियुक्त व्यक्तींपैकी कोणीही मृत्यू पावली तर, ते उपदान मागे जिवंत राहणाऱ्या नामनियुक्त व्यक्तीला किंवा व्यक्तींना दिले जाईल.

श्रमिक पत्रकाराने नामनियुक्ती करणे.

५क. (१) श्रमिक पत्रकाराला प्रदेय असलेल्या कोणत्याही उपदानाच्या संबंधात त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यामध्ये अथवा मृत्युपत्रीय किंवा अन्य प्रकारच्या कोणत्याही संव्यवस्थे-मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा श्रमिक पत्रकाराला त्या त्या वेळी देय असलेले उपदान स्वीकार-ण्याचा अधिकार विहित रीतीने केलेल्या नामनियुक्तिपत्राद्वारे कोणत्याही व्यक्तीला प्रदान झाल्याचे दिसत असेल तेव्हा, श्रमिक पत्रकाराच्या मृत्यूनंतर अन्य सर्व व्यक्ती वगळून ती नामनियुक्त व्यक्ती उपदानास व त्यासंबंधात देय असलेली रक्कम मिळण्यास हक्कदार होईल—मात्र विहित रीतीने नामनियुक्तिपत्रात फेरफार केलेला असेल किंवा ते रद्द केलेले असेल तर गोष्ट अलाहिदा.

(२) जर नामनियुक्ती करणाऱ्या श्रमिक पत्रकाराअगोदर नामनियुक्त व्यक्तीचा मृत्यू झाला अथवा दोन किंवा अधिक नामनियुक्त व्यक्ती असतील त्याबाबतीत, सर्व नामनियुक्त व्यक्ती त्याच्या अगोदर मृत्यू पावल्या तर, पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेले कोणतेही नामनियुक्तिपत्र शून्य होईल.

(३) नामनियुक्त व्यक्ती अज्ञान असेल त्याबाबतीत नामनियुक्ती करणाऱ्या श्रमिक पत्रकाराने नामनियुक्त व्यक्तीच्या अज्ञानदशेमध्ये आपला मृत्यू घडल्यास उपदान स्वीकारण्यासाठी विहित रीतीने कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करणे हे कायदेशीर असेल.]

६. (१) या अधिनियमाखाली करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कोणत्याही श्रमिक पत्रकाराला कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये कोणत्याही सलग चार आठवड्यांच्या कालावधीमध्ये भोजनाचा कालावधी वगळता, एकशे चव्वेचाळीस तासांपेक्षा अधिक तास काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही. कामाचे तास.

(२) प्रत्येक श्रमिक पत्रकाराला कोणत्याही सलग सात दिवसांच्या कालावधीमध्ये रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंतचा कालावधी धरून किमान सलग चोवीस तास इतका काळ विश्रांती दिली जाईल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "आठवडा" याचा अर्थ, शनिवारी मध्यरात्रीपासून सुरू होणारा सात दिवसांचा कालावधी, असा आहे.

७. विहित करण्यात येतील अशा सुट्टयांचा नैमित्तिक रजा किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या रजा यांना बाध न येता प्रत्येक श्रमिक पत्रकार हा— रजा.

(क) कामात व्यतीत केलेल्या कालावधीच्या एक-अकरांशाहून कमी नसेल इतकी भरपगारी अर्जित रजा ;

(ख) नोकरीच्या कालावधीच्या एक-अठरांशाहून कमी नसेल इतकी अर्धपगारी रजा वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे,

मिळण्यास हक्कदार असेल.

[1][८. (१) यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने केंद्र शासनाला,— वेतनदरांची निश्चिती अथवा त्यांत सुधारणा.

(क) श्रमिक पत्रकारांबाबतचे वेतनदर निश्चित करता येतील;

(ख) या अधिनियमाखाली निश्चित केलेल्या किंवा 'श्रमिक पत्रकार (वेतनदर-निश्चिती) अधिनियम, १९५८' (१९५८ चा २९), कलम ६ खाली काढलेल्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेतनदरांमध्ये वेळोवेळी त्याला योग्य वाटेल अशा कालांतरागणिक सुधारणा करता येईल.

(२) वेळेवारी काम किंवा उक्ते काम यांसाठी नेमलेल्या श्रमिक पत्रकारांच्या बाबतीत केंद्र शासनाला वेतनदरांची निश्चिती किंवा सुधारणा करता येईल.

९. या अधिनियमाखाली श्रमिक पत्रकारांच्या बाबतीतले वेतनदर निश्चित करण्याच्या किंवा त्यांत सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन आवश्यक असेल तेव्हा तेव्हा, एक वेतन मंडळ घटित करील व ते पुढील व्यक्ती मिळून बनलेले असेल :— वेतनदर निश्चित करण्याची व त्यांत सुधारणा करण्याची कार्यपद्धती.

(क) वृत्तपत्र आस्थापनांच्या संबंधातील नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती;

(ख) श्रमिक पत्रकारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती ;

(ग) तीन स्वतंत्र व्यक्ती—त्यांच्यापैकी एक व्यक्ती ही उच्च न्यायालयाचा किंवा सर्वोच्च न्यायालयाचा विद्यमान किंवा भूतपूर्व न्यायाधीश असेल व ते शासन तिला वेतनमंडळाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त करील.

१०. (१) मंडळ स्वत:ला योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध केलेल्या नोटीशीद्वारे, श्रमिक पत्रकारांच्या बाबतीत या अधिनियमाखाली जे वेतनदर निश्चित करता येतील किंवा ज्यांमध्ये सुधारणा करता येईल त्या वेतनदरांच्या संबंधात, वृत्तपत्र आस्थापना व श्रमिक पत्रकार आणि श्रमिक पत्रकारांच्या वेतनदरांची निश्चिती अथवा सुधारणा यामध्ये हितसंबंधित असलेल्या व्यक्ती यांनी स्वत:ला योग्य वाटतील अशी अभिवेदने सादर करावीत असे त्यांना आवाहन करील. मंडळाच्या शिफारशी.

(२) असे प्रत्येक अभिवेदन हे लेखी असेल व मंडळ नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत ते करावे लागेल आणि त्यामध्ये वेतन देण्याची नियोक्त्याची क्षमता अथवा अभिवेदन करणाऱ्या व्यक्तीला तिच्या अभिवेदनाच्या संबंधात संबद्ध वाटेल अशी अन्य कोणतीही परिस्थिती लक्षात घेता, जे वेतनदर अभिवेदन करणाऱ्या व्यक्तीच्या मते वाजवी असतील ते त्यात नमूद करावे लागतील.

(३) पूर्वोक्त अशी काही अभिवेदने असल्यास मंडळ ती विचारात घेईल आणि आपल्यापुढे ठेवलेल्या आधारसामग्रीची तपासणी करून नंतर, श्रमिक पत्रकारांबाबतच्या वेतनदरांच्या निश्चितीसाठी किंवा सुधारणेसाठी त्याला योग्य वाटतील अशा शिफारशी केंद्र शासनाला करील, आणि अशा कोणत्याही शिफारशीमध्ये कोणत्या दिनांकापासून ते वेतनदर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने परिणामक व्हावेत ते विनिर्दिष्ट करता येईल.

---

१. १९६२ चा अधिनियम ६५, कलम ४ द्वारे कलमे ८ ते १३क पर्यंतच्या मूळ मजकुराऐवजी घातले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

(४) केंद्र शासनाला कोणत्याही शिफारशी करताना मंडळ हे, राहणी खर्च, तत्सम कामधंद्यात प्रचलित असलेले वेतनदर, देशाच्या निरनिराळ्या भागांतील वृत्तपत्र उद्योगांशी संबंधित परिस्थिती व मंडळाला संबद्ध वाटेल अशी अन्य कोणतीही परिस्थिती लक्षात घेईल.

[1][**स्पष्टीकरण.**—शंका निवारणार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, या पोटकलमामधील कोणत्याही गोष्टीमुळे अखिल भारतीय पातळीवरील वेतनाचे दर निश्चित करण्यासाठी किंवा त्यांचे पुनरीक्षण करण्यासाठी शिफारशी करण्यात मंडळाला प्रतिबंध होणार नाही.]

**मंडळाच्या शक्ती व कार्यपद्धती.**

११. (१) पोटकलम (२) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, मंडळाला 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) या खाली घटित केलेले औद्योगिक अधिकरण त्याच्याकडे सोपवलेल्या औद्योगिक विवादाच्या अभिनिर्णयासाठी ज्या शक्ती वापरते त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती वापरता येतील, आणि या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेले उपबंध आणि त्यांखाली काही नियम केले असल्यास ते नियम यांच्या अधीनतेने, त्याला स्वतःची कार्यपद्धती विनियमित करण्याची शक्ती असेल.

(२) मंडळाला केलेली कोणतीही अभिवेदने आणि पुरावा म्हणून त्याच्याकडे सादर केलेले कोणतेही दस्तऐवज हे, त्या बाबतीत हितसंबंधित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने विहित करण्यात येईल अशी फी भरल्यानंतर निरीक्षणार्थ खुले ठेवण्यात येतील.

(३) जर मंडळाचा अध्यक्ष किंवा अन्य कोणताही सदस्य याचे पद कोणत्याही कारणास्तव रिक्त झाले तर, केंद्र शासन कलम ९ च्या उपबंधानुसार त्यावर अन्य व्यक्तीची नियुक्ती करून ते रिक्त पद भरील आणि ज्या टप्प्याला असे पद रिक्त झाले तेथपासूनच अशा पुनर्घटित मंडळापुढे कार्यवाही पुढे चालू करता येईल.

**वेतन मंडळाच्या शिफारशी अंमलात आणण्याच्या, केंद्र शासनाच्या शक्ती.**

१२. (१) मंडळाच्या शिफारशी मिळाल्यानंतर, होईल तितक्या लवकर, केंद्र शासन शिफारशींच्या शब्दयोजनेनुसार किंवा केंद्र शासनाच्या मते ज्यामुळे शिफारशींच्या स्वरूपात महत्वाचे बदल होत नाहीत अशी आणि त्याला योग्य वाटतील अशी, काही आपरिवर्तने, असल्यास, ती करून आदेश काढील.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर केंद्र शासनाला योग्य वाटले तर ते—

(क) पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या स्वरूपाची नसतील अशी, त्याला योग्य वाटतील ती आपरिवर्तने शिफारशींमध्ये करू शकेल :

परंतु, अशी कोणतीही आपरिवर्तने करण्यापूर्वी केंद्र शासन त्याद्वारे ज्यांच्यावर परिणाम होण्याचा संभव आहे अशा सर्व व्यक्तींना नोटीस देण्याची व्यवस्था करील आणि या बाबतीत त्या व्यक्ती जी कोणतीही लेखी अभिवेदने करतील ती विचारात घेईल ; किंवा

(ख) त्या शिफारशी किंवा कोणताही भाग मंडळाकडे निर्देशित करू शकेल व त्या बाबतीत केंद्र शासन वेतन मंडळाच्या पुढील शिफारशी विचारात घेऊन त्या शिफारशींच्या शब्दयोजनेनुसार किंवा पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाची स्वतःला योग्य वाटतील अशी आपरिवर्तने त्यात करून आदेश काढील.

(३) या कलमाखाली केंद्र शासनाने काढलेला प्रत्येक आदेश त्या आदेशाच्या संबंधात मंडळाने केलेल्या शिफारशींसह शासकीय राजपत्रात प्रकाशित केला जाईल आणि तो आदेश प्रकाशनाच्या दिनांकास किंवा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येईल.

**श्रमिक पत्रकार, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांहून कमी नाही इतक्या दराने वेतनास हक्कदार असणे.**

१३. कलम १२ खालील केंद्र शासनाचा आदेश अंमलात आल्यावर, प्रत्येक श्रमिक पत्रकार हा आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेतनदरांहून जो दर कुठल्याही परिस्थितीत कमी असणार नाही अशा दराने आपल्या नियोक्त्यांकडून वेतन मिळण्यास हक्कदार राहील.

**अंतरिम वेतनदर निश्चित करण्याची शासनाची शक्ती.**

१३क. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, तसे करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, त्याला मंडळाचा विचार घेऊन नंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे श्रमिक पत्रकाराच्या बाबतीत अंतरिम वेतनदर निश्चित करता येतील.

(२) याप्रमाणे निश्चित केलेले कोणतेही अंतरिम वेतनदर वृत्तपत्र आस्थापनांच्या संबंधातील सर्व नियोक्त्यांना बंधनकारक असतील आणि प्रत्येक श्रमिक पत्रकार हा, पोटकलम (१) खाली निश्चित केलेल्या अंतरिम वेतनदरांहून जो दर कोणत्याही परिस्थितीत कमी असणार नाही अशा दराने वेतन मिळण्यास हक्कदार राहील.

---

१. १९८९ चा अधिनियम ३१, कलम ३ द्वारे घातले.

(३) पोटकलम (१) खाली निश्चित केलेले कोणतेही अंतरिम वेतनदर, कलम १२ खालील केंद्र शासनाचा आदेश अंमलात येईपर्यंत अंमलात राहतील.]

[1][१३कक. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये श्रमिक पत्रकारांच्या संबंधात वेतनदर निश्चित करण्याच्या किंवा त्यात सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ, कलम ९ अन्वये घटित करण्यात आलेले मंडळ (कोणत्याही कारणामुळे असो) कार्यक्षमरीत्या काम करण्यास असमर्थ आहे आणि त्या परिस्थितीत अभिकरण घटित करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे मत झाल्यास त्यास या अधिनियमान्वये श्रमिक पत्रकारांच्या संबंधात वेतनदर निश्चित करण्याच्या किंवा त्यात सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, एक अधिकरण घटित करता येईल आणि जी व्यक्ती उच्च न्यायालयाचा किंवा सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश असेल अशी, किंवा होती अशा व्यक्तीचे ते अधिकरण बनेल. श्रमिक पत्रकाराच्या संबंधात वेतनदर निश्चित करणे किंवा सुधारणे याकरिता अधिकरण घटित करणे.

(२) कलमे १० ते १३क यांचे उपबंध, या कलमाच्या पोटकलम (१) अन्वये घटित करण्यात आलेल्या अधिकरणाला, केंद्र शासनाला आणि श्रमिक पत्रकारांना व त्यांच्या संबंधात लागू होतील, मात्र फरक एवढाच की,—

(क) त्यांत मंडळासंबंधी जेथे जेथे निर्देश येतील तेथे तेथे, ते अधिकरणासंबंधीचे निर्देश आहेत, असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल ;

(ख) कलम ११ च्या पोटकलम (३) मध्ये,—

(एक) मंडळाचा अध्यक्ष किंवा इतर कोणताही सदस्य याच्या पदाचा निर्देश हा, अधिकरण ज्या व्यक्तीचे बनले आहे त्या व्यक्तीच्या पदाचा निर्देश आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल ; आणि

(दोन) कलम ९ चा निर्देश हा या कलमाच्या पोटकलम (१) चा निर्देश आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल ; आणि

(ग) कलम १३ व कलम १३क मध्ये कलमा संबंधी असलेले निर्देश हे, या कलमासहित कलम १२ चे निर्देश आहेत, असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.

(३) या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडताना अधिकरणास, वेतन मंडळाने नोंदवलेल्या किंवा अंशतः वेतन मंडळाने व अंशतः स्वतः अधिकरणाने नोंदवलेल्या साक्षीपुराव्याच्या आधारे कृती करता येईल :

परंतु, ज्यांचा साक्षीपुरावा आधीच नोंदवलेला आहे अशा साक्षीदारांपैकी कोणत्याही साक्षीदाराची न्यायहिताच्या दृष्टीने आणखी तपासणी करणे आवश्यक आहे असे अधिकरणाचे मत असेल तर, ते अशा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा समन्स काढून बोलावू शकेल आणि अशी पुढील तपासणी, तसेच त्याने मुभा दिल्यास आणखी कोणतीही उलटतपासणी व फेरतपासणी झाल्यानंतर, त्या साक्षीदारास सोडून देण्यात येईल.

(४) पोटकलम (१) अन्वये अधिकरण घटित झाल्यावर, कलम ९ अन्वये घटित झालेले व अधिकरण याप्रमाणे घटित होण्याच्या लगतपूर्वी कार्य करीत असलेले मंडळ अस्तित्वात असण्याचे बंद होईल आणि त्या मंडळाच्या सदस्यांनी आपली पदे रिकामी केली असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, श्रमिक पत्रकारांच्या संबंधात कलम १३क अन्वये केंद्र शासनाने निश्चित केलेले आणि अधिकरण घटित होण्याच्या लगतपूर्वी अंमलात असलेले कोणतेही अंतरिम वेतनदर हे, या कलमासहित कलम १२ अन्वये केंद्र शासनाने काढलेला आदेश प्रवर्तित होईपर्यंत अंमलात राहतील.]

## [2][प्रकरण दुसरे-क

### पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचारी

१३ख. (१) यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने, केंद्र शासनाला— पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या वेतनदरांची निश्चिती किंवा सुधारणा.

(क) पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांबाबत वेतनदर निश्चित करता येतील; आणि

(ख) या कलमाखाली निश्चित केलेले वेतनदर स्वतःला योग्य वाटेल अशा कालांतरागणिक वेळोवेळी सुधारता येतील.

(२) पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, वेळेवारी कामाबद्दलचे व उक्त्या कामाबद्दलचे वेतनदर केंद्र शासनाला निश्चित करता किंवा सुधारता येतील.

---

१. १९७९ चा अधिनियम ६, कलम ३ द्वारे घातले (३१ जानेवारी, १९७९ रोजी व तेव्हापासून).

२. १९७४ चा अधिनियम ६०, कलम ४ द्वारे घातले.

पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांचे किंवा वेतनदर निश्चित करण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी वेतनमंडळ.

१३ग. या अधिनियमाखाली पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांबाबतचे वेतनदर निश्चित करण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी केंद्र शासन, आवश्यक असेल तेव्हा तेव्हा एक वेतनमंडळ घटित करील व ते पुढील व्यक्ती मिळून बनलेले असेल :—

(क) वृत्तपत्र आस्थापनांच्या संबंधातील नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती;

(ख) पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती; आणि

(ग) तीन स्वतंत्र व्यक्ती—त्यांच्यापैकी एक व्यक्ती ही उच्च न्यायालयाचा किंवा सर्वोच्च न्यायालयाचा विद्यमान किंवा भूतपूर्व न्यायाधीश असेल व केंद्र शासन तिला मंडळाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त करील.

विवक्षित उपबंध लागू होणे.

१३घ. कलमे १० ते १३क यांचे उपबंध हे कलम १३ग खाली घटित केलेले मंडळ, केंद्र शासन व पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचारी यांना व त्यांच्या संबंधात पुढील आपरिवर्तनांसह लागू होतील, ती अशी :—

(क) मंडळ व श्रमिक पत्रकार यांचे निर्देश जेथे येतील तेथे, कलम १३ग खाली घटित केलेल्या मंडळाचे व पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांचे निर्देश म्हणून त्यांचा अर्थ लावला जाईल;

(ख) कलम ११ च्या पोटकलम (३) मध्ये जेथे कलम ९ चे निर्देश आहेत तेथे, कलम १३ग चा निर्देश म्हणून त्यांचा अर्थ लावला जाईल; आणि

(ग) कलम १३ व कलम १३क मध्ये जेथे कलम १२ चे निर्देश आहेत तेथे, या कलमासहित कलम १२ चे निदश म्हणून त्यांचा अर्थ लावला जाईल.]

१[पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या संबंधात वेतनदर निश्चित करणे किंवा त्यांत सुधारणा करणे याकरिता अधिकरण घटित करणे.

१३घघ. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या संबंधात वेतनदर निश्चित करण्याच्या किंवा त्यात सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ, कलम १३ग अन्वये घटित करण्यात आलेले मंडळ (कोणत्याही कारणामुळे असो) कार्यक्षमरीत्या काम करण्यास असमर्थ आहे आणि त्या परिस्थितीत अधिकरण घटित करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे मत झाल्यास, त्यास या अधिनियमान्वये पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या संबंधात वेतनदर निश्चित करण्याच्या किंवा त्यात सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एक अधिकरण घटित करता येईल आणि जी व्यक्ती उच्च न्यायालयाचा किंवा सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होती अशा व्यक्तीचे ते अधिकरण बनेल.

(२) कलम १० ते कलम १३क यांचे उपबंध, या कलमाच्या पोटकलम (१) अन्वये घटित करण्यात आलेल्या अधिकरणाला, केंद्र शासनाला आणि पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना व त्यांच्या संबंधात लागू होतील, मात्र फरक एवढाच की,—

(क) त्यात मंडळ व श्रमिक पत्रकार यांच्यासंबंधी जेथे जेथे निर्देश येतील तेथे तेथे ते अनुक्रमे अधिकरण व पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचारी यांच्यासंबंधीचे निर्देश आहेत, असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल ;

(ख) कलम ११ च्या पोटकलम (३) मध्ये,

(एक) मंडळाचा अध्यक्ष किंवा इतर कोणताही सदस्य यांच्या पदाचा निर्देश हा, अधिकरण ज्या व्यक्तीचे बनले आहे त्या व्यक्तीच्या पदाचा निर्देश आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल; आणि

(दोन) कलम ९ चा निर्देश हा, या कलमाच्या पोटकलम (१) चा निर्देश आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल; आणि

(ग) कलम १३ व कलम १३क मध्ये कलम १२ संबंधी असलेले निर्देश हे या कलमासहित कलम १२ चे निर्देश आहेत, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

(३) या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडताना अधिकरणास, वेतन मंडळाने नोंदवलेल्या किंवा अंशतः वेतन मंडळाने व अंशतः स्वतः अधिकरणाने नोंदवलेल्या साक्षीपुराव्याच्या आधारे कृती करता येईल :

परंतु, ज्यांचा साक्षीपुरावा आधीच नोंदवलेला आहे अशा साक्षीदारांपैकी कोणत्याही साक्षीदाराची न्यायहिताच्या दृष्टीने आणखी तपासणी करणे आवश्यक आहे असे अधिकरणाचे मत असेल तर, ते अशा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा समन्स काढून बोलावू शकेल आणि अशी पुढील तपासणी तसेच त्याने सुभा दिल्यास आणखी कोणतीही उलटतपासणी व फेरतपासणी झाल्यानंतर, साक्षीदारास सोडून देण्यात येईल.

(४) पोटकलम (१) अन्वये अधिकरण घटित झाल्यावर, कलम १३ग अन्वये घटित झालेले व अधिकरण याप्रमाणे घटित होण्याच्या लगतपूर्वी कार्य करीत असलेले मंडळ अस्तित्वात असण्याचे बंद होईल आणि त्या मंडळाच्या सदस्यांनी आपली पदे रिकामी केली असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या संबंधात कलम १२च सहित कलम १३क अन्वये केंद्र शासनाने निश्चित केलेले आणि अधिकरण घटित होण्याच्या लगतपूर्वी अंमलात असलेले कोणतेही अंतरिम वेतनदर हे, या कलमासहित कलम १२ अन्वये केंद्र शासनाने काढलेला आदेश प्रवर्तित होईपर्यंत अंमलात राहतील.]

१. १९७९ चा अधिनियम ६, कलम ४ द्वारे घातले (३१ जानेवारी, १९७९ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण तिसरे

### वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना विवक्षित अधिनियम लागू करणे

**१९४६ चा अधिनियम २० हा वृत्तपत्र आस्थापनांना लागू असणे.**

१४. त्या त्या काळी अंमलात असल्याप्रमाणे 'औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम, १९४६' (१९४६ चा २०) याचे उपबंध जेथे वीस किंवा अधिक वृत्तपत्र कर्मचारी कामाला आहेत किंवा मागील बारा महिन्यांखालील कोणत्याही दिवशी कामाला होते अशा प्रत्येक वृत्तपत्र आस्थापनेला, जणू काही अशी वृत्तपत्र आस्थापना म्हणजे जिला पूर्वोक्त अधिनियमाच्या कलम १, पोटकलम (३) खालील अधिसूचनेद्वारे तो लागू करण्यात आला आहे अशी एखादी औद्योगिक आस्थापना असावी त्याप्रमाणे, आणि जणू काही वृत्तपत्र कर्मचारी हा त्या अधिनियमाच्या अर्थानुसार कामगार असावा त्याप्रमाणे लागू होतील.

**१९५२ चा अधिनियम १९ हा वृत्तपत्र आस्थापनांना लागू असणे.**

१५. त्या त्या काळी अंमलात असल्याप्रमाणे 'कर्मचारी भविष्य निधी '[आणि संकीर्ण उपबंध], अधिनियम, १९५२' (१९५२ चा १९) याचे उपबंध जेथे कोणत्याही दिवशी वीस किंवा अधिक व्यक्ती कामाला असतील अशा प्रत्येक वृत्तपत्र आस्थापनेला, जणू काही अशी वृत्तपत्र आस्थापना म्हणजे ज्याला पूर्वोक्त अधिनियमाच्या कलम १, पोटकलम (३) खालील केंद्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे तो अधिनियम लागू करण्यात आला आहे असा एखादा कारखाना असावा त्याप्रमाणे, आणि जणू काही वृत्तपत्र कर्मचारी हा त्या अधिनियमाच्या अर्थानुसार कामगार असावा त्याप्रमाणे लागू होतील.

## प्रकरण चौथे

### संकीर्ण

**या अधिनियमाशी विसंगत असणारे कायदे व करार यांची परिणामकता.**

१६. (१) या अधिनियमाचे उपबंध, त्यांच्याशी विसंगत असे काहीही अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी वा प्रारंभानंतर झालेला कोणताही लवादनिवाडा, करार किंवा सेवा-संविदा यांच्या अटींमध्ये अंतर्भूत असले तरी, परिणामक होतील :

परंतु, कोणत्याही बाबीसंबंधी एखाद्या वृत्तपत्र कर्मचाऱ्याला या अधिनियमाखाली ज्या लाभांवर हक्कप्राप्त झाला असता त्यांहून जे त्याला अधिक अनुकूल आहेत अशा लाभांना तो असा कोणताही लवाद निवाडा, करार किंवा सेवा-संविदा याखाली किंवा अन्यथा हक्कदार असेल तर, इतर बाबतीत त्याला या अधिनियमाखाली लाभ मिळत असले तरी, तेवढ्या बाबीपुरते त्याला अधिक अनुकूल लाभ मिळण्याचे चालू राहील.

(२) कोणताही वृत्तपत्र कर्मचारी एखाद्या बाबतीत या अधिनियमाखाली जे अधिकार किंवा सवलती मिळण्यास हक्कदार होऊ शकेल त्यापेक्षा जे त्याला अधिक अनुकूल आहेत असे अधिकार किंवा सवलती आपणांस देण्याविषयी नियोक्त्याशी करार करण्यास त्या कर्मचाऱ्याला या अधिनियमातील काहीही प्रतिबंधक आहे, असा त्याचा अर्थ लावला जाणार नाही.

**[2][नियोक्ता वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना पदच्युत, सेवोन्मुक्त करणार नाही.**

१६क. कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेच्या संबंधात कोणताही नियोक्ता कलम १२ अन्वये किंवा कलम १३ कक किंवा कलम १३ घघ कलम १२ च्या बरोबर वाचून केंद्र शासनाच्या कोणत्याही आदेशात विनिर्दिष्ट वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनाच्या दायित्वातून कोणत्याही कर्मचाऱ्याला पदच्युत, सेवोन्मुक्त किंवा सेवेतून कमी करणार नाही.]

**नियोक्त्याकडून येणे असणाऱ्या पैशांची वसुली.**

[3][१७. (१) जेव्हा एखाद्या वृत्तपत्र कर्मचाऱ्याला या अधिनियमाखाली नियोक्त्याकडून कोणतीही रक्कम येणे असेल तेव्हा, तो वृत्तपत्र कर्मचारी स्वतः किंवा त्याने याबाबतीत लेखी प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती किंवा कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असल्यास त्या कुटुंबातील कोणीही घटकव्यक्ती यांना, वसुलीच्या अन्य कोणत्याही पद्धतीला बाध न येता, त्याला येणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी राज्य शासनाकडे अर्ज करता येईल, आणि जर याप्रमाणे एखादी रक्कम येणे आहे याबाबत राज्य शासनाची किंवा राज्य शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाची खात्री झाली तर, ते जिल्हाधिकाऱ्याकडे त्या रकमेबद्दलचे एक प्रमाणपत्र देईल आणि जिल्हाधिकारी जमीन-महसुलाची थकबाकी जशी वसूल करतात तशाच रीतीने त्या रकमेची वसुली करण्याची कार्यवाही करील.

(२) या अधिनियमाखाली एखाद्या वृत्तपत्र कर्मचाऱ्याला त्याच्या नियोक्त्याकडून येणे असणाऱ्या रकमेबाबत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, स्वतः होऊन किंवा आपणांकडे आलेल्या अर्जानुसार राज्य शासनाला 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) याखाली अथवा औद्योगिक तंट्याचे अन्वेषण व मिटवणूक यांच्या संबंधी राज्यामध्ये अंमलात असणाऱ्या कोणत्याही समनुरूप कायद्याखाली त्याने घटित केलेल्या कोणत्याही कामगार न्यायालयाकडे तो प्रश्न निर्णयार्थ निर्देशित करता येईल आणि असा निर्देशित केलेला प्रश्न ही जणू काही त्या अधिनियमाखाली किंवा कायद्याखाली कामगार न्यायालयाकडे अभिनिर्णयासाठी निर्देशिलेली बाब असावी त्याप्रमाणे तो अधिनियम किंवा कायदा कामगार न्यायालयाच्या संबंधात परिणामक होईल.

---

१. १९७६ चा अधिनियम ९९, कलम १७ द्वारे (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून) आणि १९७१ चा अधिनियम १६, कलम १३ द्वारे समाविष्ट केलेल्या "व कुटुंबपेन्शन निधी" या ऐवजी हा मजकूर घातला.

२. १९८१ चा अधिनियम ३६, कलम ३ द्वारे घातले (१३ ऑगस्ट १९८० रोजी व तेव्हापासून).

३. १९६२ चा अधिनियम ६५, कलम ५ द्वारे कलम १७ ऐवजी घातले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

(३) कामगार न्यायालय आपला निर्णय ज्या राज्य शासनाने तो प्रश्न निर्णयार्थ निर्देशित केला असेल त्याच्याकडे पाठवील आणि कामगार न्यायालयाला आढळलेली कोणतीही देय रक्कम पोटकलम (१) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने वसूल करता येईल.

**नोंदवह्या, अभिलेख व हजेरीपट ठेवणे.** १७क. वृत्तपत्र आस्थापनांच्या संबंधातील प्रत्येक नियोक्ता विहित करण्यात येतील अशा नोंदवह्या, अभिलेख व हजेरीपट विहित अशा रीतीने करील व ठेवील.

**निरीक्षक.** १७ख. (१) राज्य शासनाला या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, निरीक्षक म्हणून योग्य वाटतील अशा व्यक्ती शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करता येतील आणि त्यांना कोणत्या स्थानिक सीमांच्या आत आपले कार्याधिकार बजावावे लागतील ते त्याला निश्चित करता येईल.

(२) पोटकलम (१) खाली नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक, या अधिनियमाच्या किंवा 'श्रमिक पत्रकार (वेतनदर-निश्चिति) अधिनियम, १९५८' (१९५८ चा २९) याच्या उपबंधापैकी कोणतेही उपबंध वृत्तपत्र आस्थापनांच्या बाबतीत पाळले जातात किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी—

(क) आपणांस आवश्यक वाटेल अशी माहिती सादर करण्यास नियोक्त्याला फर्मावू शकेल ;

(ख) कोणत्याही वाजवी वेळी कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेमध्ये किंवा तिच्याशी संबंधित अशा कोणत्याही वास्तूमध्ये प्रवेश करू शकेल आणि जो कोणी तेथील हुकमतदार असल्याचे आढळेल त्याला आस्थापनेतील व्यक्तींच्या नोकरीच्या किंवा त्यांना वेतन देण्याच्या संबंधातील कोणतेही हिशेब, पुस्तके, नोंदवह्या व अन्य दस्तऐवज तपासणीसाठी आपणांपुढे सादर करण्यास फर्मावू शकेल;

(ग) पूर्वोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबद्ध अशा कोणत्याही बाबतीत नियोक्ता, त्याचा अभिकर्ता किंवा नोकर अथवा वृत्तपत्र आस्थापनेची किंवा तिच्याशी संबंधित अशा कोणत्याही वास्तूची हुकूमतदार असल्याचे आढळून येणारी कोणतीही व्यक्ती अथवा जी व्यक्ती त्या आस्थापने-मधील कर्मचारी आहे किंवा होती असे समजण्यास निरीक्षकाला वाजवी कारण असेल अशी कोणतीही व्यक्ती यांची तपासणी करू शकेल ;

(घ) वृत्तपत्र आस्थापनेच्या संबंधात ठेवलेले कोणतेही पुस्तक, नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज यांच्या नकला काढून घेऊ शकेल किंवा त्यातील उतारे घेऊ शकेल ;

(ङ) विहित करण्यात येतील अशा अन्य शक्ती वापरू शकेल.

(३) प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यात अभिप्रेत असल्याप्रमाणे लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

(४) निरीक्षकाने पोटकलम (२) खाली कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू सादर करण्यास किंवा माहिती देण्यास जिला फर्मावले असेल अशी कोणतीही व्यक्ती असे करण्यास विधितः बांधलेली असेल.]

**दंड.** १८. [1][ (१) जर कोणत्याही नियोक्त्याने हा अधिनियम अथवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा काढलेला आदेश यांच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केले तर, तो दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.—

(१क) जो कोणी या अधिनियमाखाली कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरलेला असून पुन्हा त्याच उपबंधाचे व्यतिक्रमण अंतर्भूत असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरेल तो, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(१ख) तो अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तर, अपराध घडला त्यावेळी जी जी व्यक्ती कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल तिची प्रभारी होती आणि तिला जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास त्या पात्र असतील:

परंतु, अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे जर त्या व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(१ग) पोटकलम (१ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केलेला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मुकानुमतीने तो अपराध करण्यात आला होता अथवा त्याने केलेल्या कोणत्याही उघडउघड हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या अपराधा-बद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल.

---

१. १९६२ चा अधिनियम ६५, कलम ६ द्वारे पोटकलम (१) ऐवजी घातले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

(१घ) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे आणि त्यामध्ये पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे ; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.]

(२) इलाखाशहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी याचा न्यायालयाहून कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय या कलमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

(३) या कलमाखालील अपराध ज्या दिवशी घडल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्याची तक्रार करण्यात आल्याखेरीज कोणतेही न्यायालय त्याची दखल घेणार नाही.

**१९.** सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल मंडळाचा अध्यक्ष [1][किंवा ज्या व्यक्तीचे अधिकरण बनले आहे अशी व्यक्ती] किंवा अन्य कोणताही सदस्य [2][अथवा या अधिनियमाखाली नियुक्त केलेला निरीक्षक] यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही. **दायित्वनिराकरण.**

[3][**१९क.** मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ मंडळामध्ये एखादे पद रिक्त होते किंवा त्याच्या घटनेमध्ये उणीव होती या कारणावरून प्रश्नास्पद करता येणार नाही. नियुक्त्यांमधील उणिवांमुळे कृती विधिबाह्य ठरावयाच्या नाहीत.

**१९ख.** ज्याला 'मूलभूत व पूरक नियम', 'मुलकी सेवा (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) नियम', 'मुलकी सेवा (अस्थायी सेवा) नियम', 'सुधारित रजा नियम', 'मुलकी सेवा विनियम', 'संरक्षण सेवेतील सैनिकेतर व्यक्ती (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) नियम' किंवा 'भारतीय रेल्वे आस्थापना संहिता अथवा केंद्र शासन याबाबतीत शासकीय राजपत्रात अधिसूचित करील असे अन्य कोणतेही नियम किंवा विनियम लागू आहेत असा शासकीय कर्मचारी असलेल्या [4][कोणत्याही वृत्तपत्र कर्मचाऱ्याला] या अधिनियमातील किंवा 'श्रमिक पत्रकार (वेतनदर-निश्चिती) अधिनियम, १९५८' (१९५८ चा २९) यातील काहीही लागू होणार नाही.] व्यावृत्ती.

**२०.** (१) केंद्र शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **नियम करण्याची शक्ती.**

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा :—

(क) श्रमिक पत्रकारांना उपदान देणे ;

(ख) श्रमिक पत्रकारांचे कामाचे तास ;

(ग) श्रमिक पत्रकारांना अनुज्ञेय असणाऱ्या सुट्या, अर्जित रजा, वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार मिळणारी रजा, नमित्तिक रजा किंवा अन्य कोणत्याही प्रकारची रजा ;

[5][(घ) या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडताना मंडळाने [6][किंवा, प्रकरणपरत्वे, अधिकरणाने] अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ङ) नामनियुक्ती पत्रांचा नमुना आणि नामनियुक्ती करण्याची रीत ;

(च) कलम ५ क-पोटकलम (३) खाली कशा रीतीने कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करता येईल ;

(छ) नामनियुक्तीपत्रात फेरफार करणे किंवा ते रद्द करणे ;

(ज) कलम १२-पोटकलम (२) खंड (क) खालील नोटीस देण्याची पद्धती ;

(झ) वृत्तपत्र आस्थापनांनी तयार करावयाच्या व ठेवावयाच्या नोंदवह्या, अभिलेख व हजेरीपट, ते कोणत्या नमुन्यात तयार करावयाचे व ठेवावयाचे आणि त्यात कोणत्या तपशिलाची नोंद ठेवावयाची;

(ञ) निरीक्षकाला वापरता येतील त्या शक्ती ;

(ट) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.]

---

१. १९७९ चा अधिनियम ६, कलम ५ द्वारे घातले (३१ जानेवारी, १९७९ रोजी व तेव्हापासून).
२. १९६२ चा अधिनियम ६५, कलम ७ द्वारे घातले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे घातले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).
४. १९७४ चा अधिनियम ६०, कलम ५ द्वारे घातले.
५. १९६२ चा अधिनियम ६५, कलम ९ द्वारे खंड (घ), (ङ) व (च) यांऐवजी हे खंड घातले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).
६. १९७९ चा अधिनियम ६, कलम ६ द्वारे घातले (३१ जानेवारी, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[1][(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने [2][अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून] बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि [2][पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे] सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी, त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

२१. [१९५५ चा अधिनियम १ याचे निरसन.] 'निरसन व विशोधन अधिनियम, १९६०' (१९६० चा ५८)-कलम २ व अनुसूची पहिली यांद्वारे निरसित.

[3][अनुसूची

[कलम २ (घ) पहा]

१. कलम २ च्या खंड (घ) च्या प्रयोजनार्थ,—

(१) एका वृत्तपत्र आस्थापनेच्या सामाईक नियंत्रणाखाली असलेल्या दोन किंवा अधिक वृत्तपत्र आस्थापना या एकच आस्थापना असल्याचे मानण्यात येईल ;

(२) एखाद्या व्यक्तीच्या आणि त्याच्या किंवा तिच्या विवाहसाथीच्या मालकीच्या असलेल्या दोन किंवा अधिक वृत्तपत्र आस्थापना या, विवाहसाथी हा त्या आस्थापनेचा त्याच्या/ तिच्या स्वतःच्या निधीच्या आधारे एकमेव मालक किंवा भागीदार किंवा निगम निकायाचा भागधारक आहे असे दर्शविण्यात आलेले नसेल तर, एकच आस्थापना असल्याचे मानण्यात येईल ;

(३) एकच किंवा समान शीर्षक असणारे आणि एकाच भाषेतील वृत्तपत्र, भारतामध्ये कोणत्याही ठिकाणी प्रकाशित करणाऱ्या किंवा एकच किंवा समान शीर्षक असणारे परंतु एकाच राज्यात किंवा संघराज्य क्षेत्रात वेगवेगळ्या भाषेतील असणारे वृत्तपत्र प्रकाशित करणाऱ्या दोन किंवा अधिक वृत्तपत्र आस्थापना या एकाच वृत्तपत्र आस्थापना असल्याचे मानण्यात येईल.

२. परिच्छेद १(१) च्या प्रयोजनासाठी, दोन किंवा अधिक आस्थापना सामाईक नियंत्रणाखाली असल्याचे पुढील बाबतीत मानण्यात येईल—

(क) (एक) जेथे वृत्तपत्र आस्थापनांची मालकी एकाच व्यक्तीकडे किंवा सारख्याच व्यक्तींकडे असेल;

(दोन) जेथे वृत्तपत्र आस्थापनेची मालकी, ज्या संस्थांमधील बहुतांशी भागीदार समान असतील अशा संस्थांकडे असेल ;

(तीन) जेथे वृत्तपत्र आस्थापनेची मालकी एखाद्या निगम निकायाकडे असेल, आणि तो निगम निकाय इतर निगम निकायाला दुय्यम असेल, किंवा दोन्ही निगम निकाय सामाईक तिसऱ्या सूत्रधारी कंपनीला दुय्यम असतील किंवा त्यांची बहुतांश समभाग मालकी एकाच व्यक्तीकडे किंवा समान व्यक्तींच्या गटाकडे असेल-मग तो गट निगमित असो वा नसो ;

(चार) जेथे एका आस्थापनेची मालकी निगम निकायाकडे असेल आणि दुसऱ्या आस्थापनेची मालकी, एखाद्या संस्थेकडे असेल आणि जर त्या निगम निकायाच्या समभागांपैकी बहुतांश समभाग संस्थेच्या बऱ्याचशा भागीदारांनी धारण केलेले असतील ;

(पाच) जेथे एका आस्थापनेची मालकी निगम निकायाकडे असेल आणि दुसऱ्या आस्थापनेची मालकी एखाद्या संस्थेकडे असेल आणि तो निगम निकाय त्या संस्थेचा भागीदार असेल आणि अशा निगम निकायांच्या समभागांपैकी बहुतांश समभागांची मालकी, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे एकाच व्यक्तीकडे किंवा समान व्यक्तींच्या गटाकडे असेल, मग तो गट निगमित असो वा नसो; किंवा

(ख) जेथे जेथे संबंधित वृत्तपत्र आस्थापनांमध्ये कार्यात्मक एकत्व असेल.]

---

१. १९६२ चा अधिनियम ६५, कलम ९ द्वारे पोटकलम (३) ऐवजी घातले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

२. १९७४ चा अधिनियम ६०, कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. १९८९ चा अधिनियम ३१, कलम ४ द्वारे घातले.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## THE WORKING JOURNALISTS AND OTHER NEWSPAPER EMPLOYEES (CONDITIONS OF SERVICE AND MISCELLANEOUS PROVISIONS ACT, 1955

## श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| avocation | व्यवसाय .. .. | [S. 2(f)] |
| cartoonist | व्यंगचित्रकार .. .. | [S 2(f)] |
| comments | टीकाटिप्पणी .. .. | [S 2(b)] |
| copy-tester | प्रत-निरीक्षक .. .. | [S. 2(f)] |
| correspondent | वृत्तप्रतिनिधी .. .. | [S. 2(f)] |
| feature writer | विशेषसाहित्य लेखक .. | [S. 2(f)] |
| leader-writer | अग्रलेख-लेखक .. .. | [S. 2(f)] |
| news agency or syndicate | वृत्तसंस्था किंवा सिंडीकेट .. | [S. 2(d)] |
| news editor | वृत्त संपादक .. .. | [S. 2(f)] |
| newspaper | वृत्तपत्र .. .. | [S. 2(b)] |
| newspaper employee | वृत्तपत्र कर्मचारी .. .. | [S. 2(b)] |
| newspaper establishment | वृत्तपत्र आस्थापना .. .. | [S. 2(d)] |
| news photographer | वृत्तछायाचित्रकार .. .. | [S. 2(f)] |
| non-journalist newspaper employee | पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचारी .. | [S. 2(dd)] |
| periodical work | नियतकालिक .. .. | [S. 2(b)] |
| proof-reader | मुद्रित-तपासनीस .. .. | [S. 2(f)] |
| public news | लोकवार्ता .. .. | [S. 2(b)] |
| reporter | वार्ताहर .. .. | [S. 2(f)] |
| sub-editor | उप संपादक .. .. | [S. 2(f)] |
| working journalist | श्रमिक पत्रकार .. .. | [S. 2(f)] |

---

## श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५

## THE WORKING JOURNALISTS AND OTHER NEWSPAPER EMPLOYEES (CONDITIONS OF SERVICE AND MISCELLANEOUS PROVISIONS ACT, 1955

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अग्रलेख-लेखक .. | .. leader-writer | [क.२(च्)] |
| उप संपादक .. | .. sub-editor | [क.२(च्)] |
| टीकाटिप्पणी .. | .. comments | [क.२(ख्)] |
| नियतकालिके .. | .. periodical work | [क.२(ख्)] |
| पत्रकारेतर वृत्तपत्र कर्मचारी | .. non-journalist newspaper employee | [क.२(घघ्)] |
| प्रत-निरीक्षक .. | ... copy-tester | [क.२(च्)] |
| मुद्रित-तपासनीस .. | .. proof-reader | [क.२(च्)] |
| लोकवार्ता .. | .. public news | [क.२(ख्)] |
| वार्ताहर .. | .. reporter | [क.२(च्)] |
| विशेषसाहित्य लेखक | .. feature writer | [क.२(च्)] |
| वृत्तछायाचित्रकार .. | .. news-photographer | [क.२(च्)] |
| वृत्तपत्र .. | .. newspaper | [क.२(ख्)] |
| वृत्तपत्र आस्थापना .. | .. newspaper establishment | [क.२(घ्)] |
| वृत्तपत्र कर्मचारी .. | .. newspaper employee | [क.२(ख्)] |
| वृत्तप्रतिनिधि .. | .. correspondent | [क.२(च्)] |
| वृत्तसंस्था किंवा सिंडिकेट | .. news agency or syndicate | [क.२(घ्)] |
| वृत्त संपादक .. | .. newseditor | [क.२(च्)] |
| व्यंगचित्रकार .. | .. cartoonist | [क.२(च्)] |
| व्यवसाय .. | .. avocation | [क.२(च्)] |
| श्रमिक पत्रकार .. | .. working journalist | [क.२(च्)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

६७

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : ३६३ २६ ९३, ३६३ ०६ ९५
  ३६३ ११ ४८, ३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : ६६ ८८ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : ५२ २६ १५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१
  दूरध्वनी : ३३ १४ ६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : ६५ ०३ ९५ व ६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**